29

घर भाडे भत्ता
स्वतःच्या सदनिकेत/घरात राहणा-या शासकीय कर्मचा-यांच्या घरभाडे भत्त्याबाबतचे स्पष्टीकरण-

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
परिपत्रक क्रमांक:सीपीए १४८०/सीआर १४२७/एसईआर-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ ऑक्टोबर, १९८०.

वाचा:- (१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक सीपीए-१४७१/९५२-एस-३, दिनांक ७ एप्रिल, १९७२.

(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक सीपीए-१४७९/१२९२(दोन) एसईआर-५, दिनांक १४ सप्टेंबर, १९७९.

परिपत्रक:- नवीन मुंबईत बांधलेल्या घरांच्या/सदनिकांच्या संदर्भात, "महाराष्ट्राचे शहर औद्योगिक आणि विकास महामंडळ मर्यादित (सिडको) यांनी आकारलेला सेवा खर्च" घरभाडे भत्त्याची अनुज्ञेयता ठरविताना विचारात घेण्यात यावा किंवा कसे असा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. या संदर्भात सिडकोच्या अधिका-यांकडे आणि मंत्रालयाच्या संबंधीत प्रशासकीय विभागाकडे म्हणजे नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाकडे चौकशी केल्यानंतर असे निदर्शनास आले की हा "सेवा खर्च" मुंबई नागरी सेवा नियम ८४८ खालील टिप्पणी २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विशेष स्वरुपाच्या सेवांसाठी आकारण्यात येत नाही तर सदर खर्च, स्थानिक प्राधिकरणाद्वारे, त्यांच्या अधिकार क्षेत्रामध्ये, आकारण्यात येणा-या "मालमत्ता कर" अथवा त्याच धर्तीच्या अन्य कराच्याच स्वरुपाचा आहे. म्हणून शासन या परिपत्रकाद्वारे असे स्पष्ट करीत आहे की सिडकोने आकारलेला "सेवा खर्च" हा सुध्दा घरभाडे भत्त्याची अनुज्ञेयता ठरवितांना "भाडे" म्हणून समजण्यात यावा.

२. शासन पुढे असेही स्पष्टीकरण करत आहे की "परिरक्षण आणि दुरुस्त्या" या प्रकारात मोडत नसणा-या प्रमुख वाढी/बदल यांवर करण्यात आलेला खर्च सदनिका/घर यांच्या बांधकामावरील "भांडवली गुंतवणूक" म्हणून समजण्यात यावा. परंतु या प्रयोजनासाठी केलेल्या खर्च परिरक्षण व दुरुस्त्यासाठी नसल्याचे व खर्चाच्या वाजवी असल्याचे, संबंधीत कार्यकारी अभियंत्याचे अथवा सिडकोच्या सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र मात्र सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणित केलेल्या खर्चाच्या बाबी आणि प्रमाणित केलेला वाजवी खर्च घरभाडे भत्त्यासाठी व त्या संदर्भात सदनिका/घर यांचे भाडे ठरविण्यासाठी विचारात घेण्यात यावा.

३. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

17 JAN 1981

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

वि. ने. सहजवाला,
शासनाचे सहाय्यक सचिव.

प्रति

महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल-२, महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (महाराष्ट्र राज्य),
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्र्यांचे व राज्य मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*वरिष्ठ उप संचालक, वाणिज्य लेखा परीक्षा, शासकीय वाहतुक लेखा परीक्षा मंडळ, मुंबई,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाचे सर्व विभाग,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्तीय अधिकारी,
संपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन एसईआर-५, वित्त विभाग,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

*पत्राद्वारे

क्रमांक                                दिनांक

यांच्या माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी प्रत पाठविण्यात आली आहे.